-: प्रेसनोट दिनांक- ०९/०३/२०२३ :-

**आरोपी लोकसेवक हुसेनबाशा कादरसाब शेख, वय ४७ वर्षे, वरीष्ठ लिपीक, वर्ग - ३, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रूग्णालय कोल्हापूर (सी.पी.आर) सध्या रा. नागोबा मंदिराचे मागे, शनिवार पेठ, कोल्हापूर मुळ रा. अ १९५ कर्निक नगर, जिजामाता बागे जवळ, सोलापुर शहर, सोलापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार सी.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापूर येथे अधि.परिचारीका पदावर नोकरीस आहेत. त्यांना नोकरीतील पुढील लाभ मिळणेकरिता स्थायित्व प्रमाणपत्राची आवश्यकता होती. त्याकरिता त्यांनी मा. जिल्हा शल्यचिकित्सक सीपीआर रूग्णालय कोल्हापूर यांचेकडे लेखी अर्ज केला होता. त्याप्रमाणे विस दिवसापुर्वी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या सहीचे स्थायित्व प्रमाणपत्र त्यांना कार्यालयातील वरिष्ठ लिपीक शेख यांनी दिले होते. त्यानंतर वरीष्ठ लिपीक हुसेनबाशा कादरसाब शेख, यांनी तक्रारदार यांचेकडे स्थायीत्व प्रमाणपत्र दिले म्हणून ५०००/-रू.ची मागणी केली आहे.

दिनांक ०९/०३/२०२३ रोजी तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार अर्ज दिला. तकारीप्रमाणे दिनांक ०९/०३/२०२३ रोजी पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आरोपी शेख यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांना स्थायित्व प्रमाणपत्र दिले म्हणुन ५०००/- रूपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक हुसेनबाशा कादरसाब शेख, वरीष्ठ लिपीक यांनी ५०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे.

सदरबाबत **हुसेनबाशा कादरसाब शेख, वय ४७ वर्षे, वरीष्ठ लिपीक, छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रूग्णालय कोल्हापूर (सी.पी.आर)** यांचेविरूध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनानुसार श्री नितीन कुंभार, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, श्री संजीव बंबरगेकर, पोलीस उपनिरीक्षक, पो.हे.कॉ. विकास माने, पो.ना. सचिन पाटील, पो.कॉ. रूपेश माने चा. पो.हे.कॉ. सुरज अपराध ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**